जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०६/०९/२०२३
## दि.०५/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे २६४/२०२३,भादविक ३०७,३२६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६,आर्म ॲक्ट कलम ४(२५), क्रिमीनल लॉ अमेडमेंट ॲक्ट कलम ०७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)सह १३५ प्रमाणे |
| **फिर्यादी** | मयुर गायकवाड वय २४ वर्षे, रा.दत्तवाडी,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम व त्यांचे इतर ४ साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/२०२३ रोजी रात्रौ ०२/४५ वा. सुमा.९९९ चौक दत्तवाडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रांसोबत नमुद ठिकाणी गप्पा मारत उभे असताना दुचाकीवरुन आलेल्या सहा इसमांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करु लागले. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना शिवीगाळ का करता अशी विचारणा केली असता त्याचा राग येवुन नमुद इसम व त्यांचे सोबत असणारे इतर इसमांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांचेकडील हत्याराने फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांना गंभीर जखमी केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.युवराज पाटील मो.नं.९६५७०१७४७४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६०९/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३७ वर्षे रा.चंदननगर, पुणे. |
| **आरोपीत** | दिपक चंद्रकांत मांडगे वय २४ वर्षे रा.खराडी बायपास पुणे २) तुषार बाबासाहेब रसाऴ वय २५ वर्षे रा चाकण ता खेड जि पुणे ३) राधाकिसन बबन साठे वय ३० वर्षे रा कल्याणीनगर पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०९/२०२३ रोजी रात्रौ २३/०० वा.चे सुमा. ट्रम्प टॉवर समोरील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणावरून पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून फिर्यादी त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील ५०००/- रू.कि.चा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अंकुश डोंबाळे मो नं ९८२३५५६७१३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केट यार्ड पो स्टे २०८/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | हनुमंत शिंदे वय २५ वर्षे रा.मार्केटयार्ड पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/२०२३ रोजी सायं.१८/०० वा.चे सुमा.भिमाले कॉम्प्लेक्स बिल्डींगचे पार्किंगमध्ये संदेशनगर मार्केटयार्ड पुणे |
| **तपशिल** | फिर्यादी हे त्याचे मित्र गणेश वाघमारे याचेशी चेष्टा-मस्करी चालू असताना फिर्यादीने त्याचेशी केलेल्या मस्करीचा मित्रास राग आल्याने त्याने कोणालातरी फोन लावला असता मित्राचा चुलता हा बिल्डींग मधुन हातात लोखंडी हत्यार व बांबु घेवुन आला व त्याने त्याचे हातातील लोखंडी हत्याराने फिर्यादीस जिवे ठार मारण्याचे उदेशाने फिर्यादीचे डोक्यात लोखंडी हत्यार मारुन जखमी करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मदन कांबळे मो.नं.८८८८८६५९९७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५६७/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३८ वर्षे रा.त्रिमुर्ती चौक, भारती विदयापीठ पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०९/२०२३ रोजीचे सायं. १८/०० वा ते दि. ०५/०९/२०२३ रोजीचे सकाळी ०८.०० वा.चे दरम्यान फ्लॅट नंबर ए-७ सर्व्हे नंबर १२८/२ डि इच्छापुर्ती गणपती समोर, त्रिमुर्ती चौक, भारती विदयापीठ पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी बंद फ्लॅटच्या दरवाजचे सेफ्टी डोअरचा कोयंडा कोणीतरी अज्ञात इसममाने कशाने तरी कापुन दरवाजा उघडुन आत प्रवेश करुन घरातील १,९७,०००/- रु कि.चे सोन्याचे दागिणे घरफोडी करून चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. समीर कदम मो.नं. ८८०५००१४२७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १८२/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४ महा.पो.अधि.कलम ३७(१) सह १३५ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५)क्रिमीनल लॉ अमेंडमेंट क.७ |
| **फिर्यादी** | अझर हंमजा शेख वय ३० वर्षे रा.अप्पर बिबवेवाडी पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे दोन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०९/२०२३ रोजी रात्री २२/४५ वा चे सुमा.पासलकर चौक येथील संगम हॉटेल समोरील रोडवर बिबवेवाडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मावस भाऊ सलमान खान याच्या कोंढवा येथील घरुन त्याचा वाढदिवस साजरा करुन घरी येत असताना नमुद ठिकाणी पार्सल घेण्याकरीता थांबलेल्या नमुद इसम याने धक्का लागल्याचे कारणावरुन फिर्यादी याला हाताने मारहाण व शिवीगाळ करुन त्याच्या इतर दोन साथिदारांनी फिर्यादी यांनी जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने लोखंडी हत्याराने वार करुन गंभीर जखमी करून फिर्यादीचा मित्र सुलतान शेख यास सुध्दा लोखंडी हत्याराने वार करुन गंभीर जखमी करुन हातातील लोखंडी हत्यारे लोकांच्या दिशेने हवेत फिरवत शिवीगाळ आरडाओरडा करत पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.किरण देशमुख मो.नं.९८२१२६८७६६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ७१९/२०२३,भादविक ४६१,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५२ वर्ष, रा हिंजवडी पुणे. |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०४/२०२३ रोजी ते दि.०५/०९/२०२३ रोजी १०/१५ वा चे सुमा.सर्वे नं १५५२ उबाळे नगर बालाजी ग्रेनेट वाघोली ता.हवेली जि.पुणे.येथे असलेले सिल्व्हर क्लाऊड इंन्वेस्टमेन्ट प्रा.लि.कंपनीचे वर्कशॉप मधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा नमुद ठिकाणी असलेले फर्निचर बनविण्यासाठी लागणारे साहित्य हे कोणीतरी वर्कशॉपचा पाठीमागील बाजुचा पत्रा उचकटुन त्यामधील ५,५०,०००/- रू.कि.चे साहित्य हे अज्ञात चोरटयाने चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. गजानन जाधव मो नं.९८२२७४२३३३ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे २६६/२०२३,भादविक १४३,१४४,१४७,१४८,१४९,३२३,४२७,५०४,५०६,५०७,आर्म ॲक्ट कलम ४(२५), क्रिमिनल लॉ अमे.ॲक्ट कलम ७ प्रमाणे |
| **फिर्यादी** | अभिजीत गोरीवले, वय २४ वर्षे, रा.शिवदर्शन,पर्वती पुणे |
| **आरोपीत** | नऊ ते दहा इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०९/२०२३ रोजी ११/३० वा.चे सुमा.आंबेडकर वसाहत पाय-यांजवळ व दि.०५/०९/ २०२३ रोजी गोलघर पी/१७८ पर्वती दर्शन पुणे येथे सार्वजनिक ठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे फुलांच्या माळा तयार करुन देणा-या एका इसमाकडे यांचे घरी नमुद ठिकाणी त्यांचे घरी फुले टाकण्यासाठी गेले असता तेथे त्यांचा मित्र नमुद इसम यांनी काहीएक कारण नसताना हाताने मारहाण व शिवीगाळ करुन, जीवे मारण्याची धमकी देवुन फिर्यादीकडील दुचाकी गाडीवर दगड मारुन नुकसान केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस बी निकाळजे मो नं.९३५९२८८८५१ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १३२३/२०२३,भादविक ३०४(अ),२७९,मोवाका क ११९/१७७,१३४ (अ)(ब) |
| **फिर्यादी** | रितेश रायभान,वय २६ वर्ष,रा.एम जी रोड पुणे |
| **आरोपीत** | टेम्पो वरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/२०२३ रोजी रात्रौ ०२/०० वा पावर हाऊस फुरसुंगी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा मित्र नामे प्रांजल बोराटे,वय २७ वर्ष,रा.वानवडी पुणे असे मोटारसायकल वरुन काम करुन सासवड वरुन रहते घरी जात असताना नमुद ठिकाणी आलो असताना समोरुन येणारा टेम्पो वरील चालक त्याचे ताब्यातील टेम्पो हा बेदरकारपणे व हयगयीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलीस जोरात धडक देवुन फिर्यादी यांना गंभीर जखमी करून मित्र प्रांजल बोराटे वय २७ वर्ष याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.तृप्ती खळदे मो नं ७३५०४२१९६१ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६१०/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एम भास्करा वय ५१ वर्षे रा.हरिगंगा सोसायटी समोर येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि ०२/०९/२०२३ रोजी रात्री २२/०० ते दि ०३/०९/२०२३ सकाळी ०८/३० वा सुमा. भारतीय सर्वेक्षण विभाग बगीचा परिसर येरवडा,पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे भारतीय सर्वेक्षण विभाग,येरवडा पुणे येथे सर्वेक्षण अधिकारी व येरवडा परिसरातील सुरक्षे संदर्भात महाराष्ट्र सुरक्षा दल यांचे गार्डाचा चार्ज म्हणुन काम पाहत आहे नमुद ठिकाणाचे बगीचा परिसरातुन कोणीतरी अज्ञात व्यक्तीने ५,०००/-रु.कि.चे दोन चंदनाचे झाडाचा बुंध्या पासुन वरील तुकडा चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार काळेल मो.नं.८८८८८०८९०५ |

## प्रेस नोट दि.०६/०९/२०२३

## <u>दि.०६/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १३/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१०

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १९२/२०२३,भादविक ३०७,३४१ भारतीय शस्त्र अधिनियम ४ (२५) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)(३) सह १३५ |
| **फिर्यादी** | एक मुलगा वय १९ वर्षे रा.हत्ती गणपती सदाशिव पेठ पुणे. |
| **आरोपीत** | अज्ञात तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०६/०९/२०२३ रोजी पहाटे २/०० वा.च्या सुमा.शक्ती स्पोर्टर्स टिळक रोड,पुणे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र कुणाल शेवाळे व ओम भिलारे यांच्यासह लायब्ररी मधुन घरी जाताना नमुद ठिकाणी येथे एका गाडीवरुन आलेल्या नमुद तीन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना अडवुन, लोखंडी हत्याराने फिर्यादीच्या डोक्यावर वार करुन त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. वर्षाराणी सुतार मो नं ८८८८१५३२५६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**